जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

## प्रेसनोट क्रमांक - ३०४ दिनांक - ३१/०७/२०२४

युनिट - ६ गुन्हे शाखा, पुणे शहर

### वाघोली येथील दरोडयाच्या गुन्हयातील ०५ पाहिजे आरोपीना केले जेरबंद

दि. २८/०७/२०२४ रोजी वाघोली येथील चोखीदाणी रोडवरील दुर्गामाता मंदिर येथे फिर्यादी हे त्यांचे चुलत भाऊ यांचे सह भाजी खरेदी करण्यासाठी पायी जात होते. त्यावेळी एका मुलाने फिर्यादीच्या खांद्याला धक्का दिला, म्हणून फिर्यादीने त्यास पाहून चालत जा, असे म्हणाले. त्याचा राग मनात धरुन नमुद इसमांनी फिर्यादी व त्यांच्या बरोबरील तिघांना लाथाबुक्क्यांनी व लाकडी दांडक्याने मारहाण केली. गाडीत जबरदस्तीने बसवून गाडीचे नुकसान झाले आहे, असे सांगून त्या बदल्यात पैशांची मागणी केली. फिर्यादी यांचे चुलता अजिज अहमद यांचे गुगल पेवरुन १८ हजार रुपये गाडीवरील चालकाचे गुगल पे अकाऊंटवर जबरदस्तीने घेतले. सदर बाबत लोणीकंद पो.स्टे.गु.र.नं.७३४/२०२४ भा.न्या.सं.कलम ३१०(२),१४०(३),३५१ (२)प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

सदर गुन्हयाच्या संदर्भात गुन्हे शाखा, युनिट ६ कडील पोलीस अंमलदार हे युनिट हद्दीत गुन्हे प्रतिबंधक गस्त करत असताना यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, या गुन्हयातील पाहिजे आरोपी कुमार पवार, नितीन पवार, ओम गव्हाणे, मनोज निंबाळकर, विकास कांबळे हे आव्हाळवाडी गावचे हद्दीत आव्हाळवाडी खराडी रोडवरील बायफ कंपनीजवळ लाल रंगाचे गाडीसह उभे आहेत अशी खात्रीशीर बातमी मिळाली.

सदरची मिळालेल्या बातमीच्या ठिकाणी स्टाफसह जाऊन त्यांना शिताफीने सापळा रचून ताब्यात घेऊन,त्यांना त्यांचे नाव पत्ता विचारले असता त्यांनी त्यांची नावे अनुक्रमे **१)कुमार मोहन पवार,वय २२ वर्षे,रा.उबाळेनगर,वाघोली,पुणे २)नितीन मोहन पवार,वय १९ वर्षे,रा सदर ३)ओम लक्ष्मण गव्हाणे, वय १९ वर्षे,रा.सदर ४)मनोज सुखदेव निंबाळकर, वय २१ वर्षे,रा. सदर ५) विकास दिगंबर कांबळे,वय २१ वर्षे,रा. सदर** अशी असल्याचे सांगितले. त्यांचे कडून गुन्हयात वापरलेली कार तपास कामी जप्त करण्यात आली आहे. आरोपीना पुढील तपासकामी लोणीकंद पोलीस स्टेशन यांचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची उल्लेखनीय कामगिरी मा.पोलीस उप-आयुक्त गुन्हे,श्री.अमोल झेंडे, मा.सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे २ श्री.सतीश गोवेकर यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, युनिट ६ चे पोलीस निरीक्षक श्री.उल्हास कदम, रमेश मेमाणे, कानिफनाथ कारखेले, नितीन मुंढे, ऋषिकेश ताकवणे, समीर पिलाने, ऋषिकेश व्यवहारे, सचिन पवार, शेखर काटे, नितीन धाडगे, बाळासाहेब तनपुरे, किर्ती मांदळे, प्रतिक्षा पानसरे व सुहास तांबेकर यांनी केली आहे.